रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३ रा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात शनिवार ( दि १६) रोजी जन्माष्टमीनिमित्त दहीहंडीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळपासूनच सुरू असलेल्या पावसामुळे गोविंदा पथकांचा उत्साह द्विगुणीत झाला होता. शहरातील अनेक भागांमध्ये विविध गोविंदा पथकांनी थरावर थर लावत भर पावसात दहीहंडी फोडली.

शहरात विविध ठिकाणी दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक ठिकाणी गोविंदा पथकांना पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता. पावसाची संततधार सुरू असूनही गोविंदांचा उत्साह जराही कमी झाला **पान २ वर**

# युवकांनी धर्माकडे सकारात्मक दृष्टिकोनाने बघत धर्माचा अर्थ आणि महत्त्व समजून घेणे आवश्यक - आमदार बबनराव लोणीकर

## श्री रामेश्वर महादेव मंदिर प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण

**मंठा । प्रतिनिधी -** युवकांनी धमर्किडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यांनी धर्माचा अर्थ आणि महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे, तसेच धर्मातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करणे आवश्यक आहे. युवकांनी धमर्तिील रूढीवादी विचार आणि परंपरांवर प्रश्न विचारणे आवश्यक आहे. त्यांनी धर्माचा चिकित्सक दृष्टीने विचार करणे आणि त्यातील योग्य आणि अयोग्य गोष्टी वेगळ्या करणे आवश्यक आहे. विविध धर्मांबद्दल आणि श्रद्धांबद्दल सहिष्णुता ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला तिच्या आवडीचा धर्म निवडण्याचा आणि त्यानुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे. युवक हे समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांनी सामाजिक समस्यांवर मात करण्यासाठी आणि समाजाला अधिक न्याय्य बनवण्यासाठी एकत्र काम करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा येथे प्रति केदारनाथ धाम प्रतिकृती असणारे श्री राम ेश्वर महादेव मंदिर प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रम प्रसंगी आमदार लोणीकर बोलत होते. सातत्याने तीन दिवस पावसात भिजत आमदार लोणीकर यांचा तिरंगा यात्रेसह प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रम प्रसंगी उपस्थिती होती. यावेळी श्रीक्षेत्र नांगरतास व श्रीक्षेत्र शंभू महादेव संस्थानचे महंत श्री भागवतगिरी महाराज व श्री महंत बालकगिरी महाराज यांचे विशेष उपस्थिती होती. आजच्या युवक पिढीसाठी धर्म काय आहे, त्याची भूमिका काय आहे आणि त्याचा त्यांच्या जीवनावर कसा परिणाम होतो याबद्दल अनेक प्रश्न आहेत. काही युवकांसाठी धर्म हा म ार्गदर्शक आणि नैतिक आधार आहे, तर काहींसाठी तो रूढी आणि परंपरांशी संबंधित आहे. युवकांसाठी धर्म हा जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. ते धार्मिक कार्यांमध्ये सक्रियपणे सहभागी होतात आणि त्यांच्या श्रद्धांनुसार जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यासाठी धर्म प्रेम, सहानुभूती आणि सामाजिक न्यायासारख्या मूल्यांवर आधारित आहे असेही आमदार श्री बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, आजकाल, अनेक युवक धर्माकडे अधिक चिकित्सक दृष्टीने पाहतात. ते धर्मातील रूढीवादी विचार आणि परंपरांवर प्रश्न विचारतात आणि त्यांच्यासाठी अधिक आधुनिक आणि स्वीकारार्ह दृष्टिकोन शोधतात. काही युवक धर्माला सामाजिक आणि राजकीय कारणांसाठी वापरले जात आहे असे मानतात. सामाजिक समस्यांवर मात करण्यासाठी आणि समाजाला अधिक न्याय्य बनवण्यासाठी युवक धर्माचा वापर करू शकतात. ते धार्मिक मूल्यांचा वापर करून सामाजिक सुधारणा घडवून आणू शकतात. धार्मिक नेत्यांशी संवाद साधून सामाजिक समस्यांवर तोडगा काढू शकतात आणि समाजाला एकत्र आणू शकतात. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार वर्षातील एक पवित्र आणि महत्वाचा महिना आहे. हा महिना भगवान शंकराला समर्पित असून, या महिन्यात उपवास, पूजा आणि धार्मिक कार्यांना विशेष महत्व दिले जाते. विशेषतः महाराष्ट्रात श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्व आहे. श्रावण महिना भगवान शंकराला अत्यंत प्रिय आहे. त्यामुळे या महिन्यात शिवभक्त उपवास, अभिषेक आणि विविध धार्मिक विधी करून शंकराची आराधना करतात. श्रावणात अनेक लोक सोमवार, मंगळवार किंवा संपूर्ण म हिनाभर उपवास करतात. यामुळे शरीराला आणि मनाला विश्रांती मिळते असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, श्रावणात अनेक सण साजरे केले जातात. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी असे सण याच म हिन्यात येतात. श्रावण महिन्यात निसर्गाची हिरवळ बहरलेली असते. पावसाळ्यामुळे वातावरण आल्हाददायक आणि प्रसन्न असते. श्रावण महिना अध्यात्मिक दृष्टीने महत्वाचा मानला जातो. या महिन्यात धार्मिक कार्यांना विशेष महत्व असल्याने, लोक जास्तीत जास्त वेळ धार्मिक कृत्यांमध्ये घालवतात. श्रावणात अनेक जण देवळात जातात, धार्मिक कथा-पुराणे वाचतात आणि प्रवचन ऐकतात. यामुळे मन शांत आणि प्रसन्न राहते असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी सतीशराव निर्वळ, पंजाबराव बोराडे, राजेश मोरे, ज्येष्ठ नेते बाबुराव शहाणे, अंकुशराव अवचार, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, **पान २ वर**



युवा आदर्श


### नॉनवेज ...

मांसाहारा पर्याय नसे
खाणारे देतात दाखले
जीवोजीवस्य जीवनम्
ब्रीदवाक्य कसे रेखले
जीभेले लागले चोचले
अगदी बरोबर जोखले
प्रोटिनसाठी नॉनवेज
पुरावे देतात खोकले
नवीन प्राणी खायला
आबाल वृद्ध शिकले
वटवाघूळ साप विविध
सगळे जातात विकले
समस्त जीवांच्या हत्या
रे रक्ताने तोंड माखले
पापपुण्य विधी निषेध
सगळे अलगद झाकले
मास कुणी महाग केले
कितीदा गरळ ओकले
भाज्यापण महागल्या
उगांच कसले कोकले
शाकाहार करणा-या
नेहमीचं गौण रेखले
झाडपाला उगा खाई
खरे शाकाहारी चुकले

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# गेडोर टी पॉईंटला कालिंका स्टीलचा सामाजिक उपक्रम; सिग्नल बसवून वाहतूक शिस्तीला नवा आधार

## पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडून सत्कार; संचालक मंडळाचा पुढाकार कौतुकास्पद





**गेडोर टी पॉइंट ला कालीका स्टीलच्यावतीने सिग्नल बसवण्यात आले उदघाटनापूर्वी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करतांना कालीका स्टीलचे संचालक अरुण गोयल, घनश्यामशेठ गोयल, अनिल गोयल व गोविंद गोयल अनुज बन्सल पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात सिग्नल बसवण्यासाठी कालीका स्टीलचे संचालक घनश्यामसेठ गोयल व बनारसदास जिंदल यांनी मदत केल्याने पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी घनश्याम गोयल यांचा सन्मान चिन्ह व पुष्पगुछ देऊन गौरव केला.** (छायाचित्र शरद खानापुरे जालना)

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या चौकांपैकी एक असलेल्या गेडोर टी पॉईंटवर वाहतुकीची कोंडी आणि अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला होता. पादचारी, विद्यार्थी, शेतकरी तसेच व्यावसायिक नागरिक यांना रस्ता ओलांडणे कठीण झाले होते. या गंभीर समस्येची दखल घेत शहरातील अग्रगण्य औद्योगिक घराणे कालिंका स्टील पुढे सरसावले. त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून (CSR) या ठिकाणी अत्याधुनिक सिग्नल व्यवस्था बसविण्यात आली आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन करण्यापूर्वी आयोजित कार्यक्रमात जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचा म ान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कालिंका स्टीलचे संचालक अरुण गोयल, घनश्यामशेठ गोयल, अनिल गोयल, गोविंद गोयल तसेच अनुज बंसल उपस्थित होते.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, जालना हे मराठवाड्यातील वेगाने विकसित होणारे औद्योगिक आणि व्यापारी केंद्र आहे. वाहतूक शिस्त राखण्यासाठी आणि अपघातांना आळा घालण्यासाठी सिग्नल व्यवस्था ही काळाची गरज होती. कालिंका स्टीलने सामाजिक जाणीव ठेवून पुढाकार घेतल्यामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुकर होणार आहे. प्रशासनासह समाजातील इतर घटकांनीही अशी जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

प्रसंगी वाहतूक सिग्नल बसविण्यासाठी कालिका स्टिलचे संचालक घनश्यामसेठ गोयल, बनारसदास जिंदल यांनी मदत केल्याने पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन घनश्याम सेठ गोयल यांचा गौरव केला.

या प्रसंगी संचालक मंडळातील म ान्यवरांनी सांगितले की, कालिंका स्टील ही केवळ उद्योग क्षेत्रापुरती मर्यादित नाही, तर समाजाप्रतीही आपली बांधिलकी जपते. शैक्षणिक, सामाजिक आणि वाहतूक सुरक्षेसाठी आवश्यक असेल तेथे आम्ही पुढेही असे उपक्रम राबवणार आहोत. नागरिकांच्या सहकार्याने जालना शहराच्या प्रगतीत हातभार लावणे हेच आमचे ध्येय आहे.

नव्या सिग्नलमुळे परिसरातील शाळकरी मुलांना, पादचारी नागरिकांना आणि वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

गेल्या काही वर्षांपासून वाहतुकीची समस्या गंभीर झाली होती. चौकात शिस्त नसल्यामुळे अपघातांचा धोका होता. कालिंका स्टीलने पुढाकार घेतल्याने ही सम स्या मोठ्या प्रमाणावर सुटणार आहे, असे मत स्थानिक व्यावसायिकांनी व्यक्त केले.

गेडोर टी पॉईंटवरील हा सिग्नल केवळ वाहतुकीचा प्रश्न सुटवणारा नाही, तर सामाजिक उत्तरदायित्वाच्या दिशेने उद्योग क्षेत्राने उचललेले कौतुकास्पद पाऊल आहे.



# संपादकीय

## नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची काल १६ ऑगस्ट रोजी पुण्यतिथी होती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-ाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्याम ाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### वाचकांचे मनोगत

#### १०६ हुतात्मा स्मारकांचे स्मरण ...

तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले कोकणातील पहिले मुख्यमंत्री १९८० च्या दशकात झाले तेव्हा त्यांनी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले.कुलाबा जिल्ह्याचे नामांतर रायगड केले.महाराष्ट्र राज्य स्थापन करताना संघर्षाच्या लढ्यात १०६ जणांनी हौतात्म्य पत्करले त्यांची स्मारके त्यांच्या मूळ गावात बांधण्याचा निर्णय घेतला.सद्या महाराष्ट्र या ना त्या कारणाने चर्चेत आहे.मग तो हिंदी भाषेचा विषय असो अथवा काय खावे काय खाऊ नयेत याचा असो.म्हणून १०६ हुतात्मांचे स्मरण झाले.बांधण्यात आलेली स्मारके महाराष्ट्रात आहेत. म हाराष्ट्र सरकारने हुतात्मा स्मारकांचे पावित्र्य राखण्यासाठी तेथे सुशोभीकरण करून देखभाल होते आहे की नाही याची माहिती घेऊन हुतात्मा स्मारकांचे जतन करावे.जेव्हा जेव्हा महाराष्ट्रावर, मराठी माणसावर अन्याय होतो तेव्हा महाराष्ट्रासाठी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांचे स्मरण होते.हुतात्मा स्मारक चौकात जाऊन नेते फुले वाहतात.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# इंग्रजांच्या भुमित इंग्रज अधिकारी कर्झन वायलीची हत्या करणारे महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा

मदनलाल धिंग्रा यांचा जन्म १८ सप्टेंबर १८८३ ला अमृतसर येथे उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला.त्यांचे वडील एक ख्यातनाम डॉक्टर होते आणि बंधू बॅरिस्टर होते. मदनलालांचे शिक्षण अमृतसरला झाले. ते पंजाब विद्यापीठातून बी. ए. झाले व १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तत्पूर्वी विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह झाला. इंग्लंडमध्ये त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचा अभ्यास केला. तेथील वास्तव्यात त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर, श्यामजी कृष्णवम र्ा, हरदयाळ शर्मा वगैरे क्रांतिकारकांशी स्नेह जमला व तेथूनच त्यांच्या हृदयात क्रांतीची मशाल धकधकायला लागली.इंग्लंडमध्ये शिकत असताना त्यांनी सर विलियम कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या केली. या घटनेचा २० व्या शतकातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील पहिल्या क्रांतीकारी घटनांपैकी एक म्हणून उल्लेख केला जातो. मदनलाल धिंग्रा होमरूल लीग व सावरकरांच्या अभिनव भारत या संस्थांचे सभासद झाले. त्यांच्या भावनाप्रधान मनावर खुदिराम बोस व कन्हैयालाल या क्रांतीवीरांच्या बलिदानाचा फार मोठा परिणाम झाला होता.त्यांनी सशस्त्र क्रांतिवीरास साजेसे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी भारताच्या मंत्र्याचा स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली याच्या खुनाचा कट रचला. त्यांचा पहिला बेत फसला. पुढे १ जुलै १९०९ रोजी इंपीरियल इन्स्टिट्यूटच्या जहांगीर हाऊसमध्ये इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी त्यांनी कर्झन वायली यावर गोळ्या झाडल्या व त्यांची हत्या केली.कारण बंगालची फाळणी करण्यात कर्झन वायलीचा हात होता व भारतात ब्रिटिश सरकार व्दारे भारतीयांची अमानवी हत्या त्यांना पहावली नाही व अमानवी हत्यांचा बदला घेण्याच्या उद्देशाने इंग्लंडम ध्ये म्हणजे त्यांच्या घरात घुसून कर्झन वायलीची हत्या केली व एक देशभक्त पूर्ण कृत्याच्या स्वरूपात विल्यस कर्झन वायली या ब्रिटिश अधिकाऱ्याला यमलोक पोहचविले व विदेशात जाऊन ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करणारा २० व्या शतकातील पहिला स्वतंत्र चळवळीतील क्रांतिकारक म्हणून मदनलाल धिंग्रा यांचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतले जाते.या खुनाबद्दल मदनलाल धिंग्रा यांना अवघ्या महिन्याभरात फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली व १७ ऑगस्ट १९०९ ला इंग्लंडच्या पेन्टोनव्हिल तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली व क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा ‘भारत माता की जय’च्या उद्धोषात हसत हसत फासावर गेले.अशा महान क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा यांना कोटी कोटी प्रणाम.फाशीवर जाण्यापूर्वीच्या शेवटच्या वक्तव्यात मदनलाल धिंग्रा म्हणले आहे आत्म बलिदान कसे करावे ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानात देण्यायोग्य आहे. ही शिकवण देण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वतःचे बलिदान करून म ोकळे होणे होय.१७ ऑगस्ट १९०९ हा दिवस कुणीही सच्चा देशभक्त कधीही विसरणार नाही. कारण याच दिवशी सर विल्यम हट कर्झन वायली या इंग्रज अधिकार्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा हसत हसत फासावर चढले.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी थोर क्रांतीकारकारकांच्या पावलावर पाऊल ठेवून देशहित कार्य करण्याची गरज आहे. देशात वाढता भ्रष्टाचार यावर अंकुश अती आवश्यक आहे. कारण आज वाढता भ्रष्टाचार व राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली वाममार्गाने कम विलेली अमाप चल-अचल करोडोंची संपत्ती यामुळे देशात महागाई, बेरोजगारी,भुकम री,कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी मोठ्या प्रम ाणात समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.क्रांतिकारकांनी देश स्वतंत्र करण्यासाठी आपले बलिदान दिले.परंतू आज आपण स्वतंत्र भारतात वावरतो आहे.त्यामुळे क्रांतिकारकांच्या बलिदानाला



कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेऊन देशहिताचे कार्य केले पाहिजे व देशाला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजांनी देशाला लुटले त्यापेक्षा हजार पटीने आजचा भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरत आहे व देशाला खिळ-खिळा करीत आहे यावर सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे क्रांतिकारकांची जोत नेहमी प्रज्वलित रहावी व आपल्या हृदयात त्यांच्या आठवणी निरंतर जीवीत राहाव्यात यासाठी आजच्या दिवशी सरकार, प्रशासकीय विभाग, स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था व शाळा -म हाविद्यालय यांनी वृक्षलागवडीला प्राधान्य दिले पाहिजे.कारण या दिवशी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या पानात,फ ुलात,फळात व जळामुळात आपल्याला संपूर्ण क्रांतिकारकांचे अवश्य दर्शन होईल.शहीद मदनलाल धिंग्रा ह्यांना कोटी-कोटी प्रणाम,जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# क्रांतीवीर मदनलाल धिंग्रा

भारतीय क्रांतिकारकांचा इतिहास पाहिला तर, पंजाबमधील आद्य क्रांतिकार म्हणून मदनलाल धिंग्रा यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. मदनलाल धिंग्रा यांचा १७ ऑगस्ट हा बलीदानदिन ! त्यांच्याविषयी थोडेसे.

मदनलाल धिंग्रा यांचा जन्म १८ फ ेब्रुवारी, १८८३ साली पंजाबमधील एका क्षत्रिय घराण्यात झाला. सन १९०६ मध्ये ते आगबोटीवर काम करुन स्वकष्टाने इंग्लंडला गेले. सन १९०८ पासून स्वातंत्र्यवीर सावरकर, शामाजी कृष्णवर्मा इ. च्या सहवासात आल्यावर त्यांच्या विचारांच्या प्रभावाने प्रेरित होऊन मदनलाल



यांच्यातील क्षात्रतेज व देशप्रेम जागृत झाले. त्यांनी कर्झन वायली या दुष्ट जुलमी व भारतद्वेषी अधिकार्याला संपविण्याचा निश्चय केला. लंडन येथील नॅशनल इंडियन असोसिएशनच्या सभेला व समारंभाला कर्झन येणारे आहे. ही खात्रीलायक बातमी मदनलाल यांना समजली होती. समारंभात मदनलाल यांनी चार गोळया झाडल्या. कर्झन हे तत्काळ जागेवर ठार झाले. मदनलाल यांना तेथेच पकडण्यात आले. लंडन येथील पेन्टेनव्हिली या करागृहात दि. १७ ऑगस्ट १९०९ रोजी सकाळी ९ वाजता या क्रांतिवीराला फाशी देण्यात आली. मदनलाल यांचे विचार अत्यंत स्पष्ट होते व ते तितक्याच स्पष्टपणे व्यक्त करीत असत की, ‘परकीय शस्त्रात्रांच्या सहाय्याने दास्यात जखडून पडलेले राष्ट्र हे निरंतरच युध्दमान राष्ट्र होय. नि:शस्त्रांना उघडपणे रणांगणात उतरुन सामना देणे अशक्य असल्यामूळे मी दबा धरुन हल्ला चढविला. बंदुका तोफा वापरायची मला परवानगी नाही म्हणून मी पिस्तूल वापरले. भारतीयांजवळ म ातृभूमीसाठी देता येईल, तर ते स्वत:चे रक्तच होय.’

मदनलाल हे उच्च शिक्षणासाठी लंडन येथे रहात होते. सावरकर जेव्हा तिथे होते तेव्हा त्यांना एका भोजनप्रसंगी वर्णद्वेषाचा अनुभव आला. त्यांना वेगळया टेबल वर बसण्यास सांगितले. जाज्वल्य देशाभिमान आणि अत्यंत स्वाभिमानी सावरकरांना ही गोष्ट सहन झाली नाही आणि ते तिथून बाहेर पडले. त्या वेळी मदनलाल आणि त्यांचे एक मित्र तिथे उपस्थित होते. म दनलाल यांनी सावरकरांना समजवण्याचा प्रयत्न केला की,हीअशी वागणूक त्यांना अंगवळणी करून घ्यायला हवी. म दनलाल आणि सावरकर यांचीहीपहिली भेट. मदनलाल तसे श्रीमंत घराण्यातले होते. त्यांच्यात देशभक्ती निर्माण झाली ते सावरकरांच्या विचारांमुळे. हा प्रभाव इतका प्रचंड होता की पुढे स्वत:च्या जीवाची पर्वा न करता ते कर्झन वायलीचा खून करण्यास तयार झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी देशभक्तांनी अनेक मार्ग शोधले. इंग्रजांना जरब बसावी यासाठी देशभक्तांनी क्रांतीकारक मार्गाने लढा दिला. तसेच राष्ट्ररक्षण व ब्रिटिशांपासून सुटका यासाठीअनेक क्रांतीकारक संघटना उदयास आल्या. मदनलाल धिंग्रा हे अभिनव भारत या क्रांतीकारकी संघटनेचे सदस्य बनले. सन १९०९ मध्ये या जहाल क्रांतीकारकाने लंडनमध्ये एका माजी इंग्रज अधिकाऱ्याचा वध केला. धिंग्रा यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकाच्या रक्तातून म हान स्वातंत्र्याची बिजे रूजली हे जास्त महत्वाचे आहे.

१७ ऑगस्ट १९०९ ला मदनलाल धिंग्रा यांना फाशी देण्यात आली. त्यांचा मृतदेहसुद्धा अग्नीसंस्कारासाठी मित्रांना न देता पेंटनव्हील कारागृहातच पुरण्यात आला. आई-वडील, पत्नी व मुलगा यांना हिंदुस्थानातच सोडून आलेल्या धिंग्रांचे या वेळी वय होते फक्त २५ वर्षे ! राजधानीत एका उच्चपदस्थ इंग्रजाला कंठस्नान घालणार्या या महान क्रांतीकारकाला शतशः प्रणाम !

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती, संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

### पान १ वरुन

#### जालन्यात भर ...

नाही. 'गोविंदा आला रे आला'च्या गजरात, तरुणांनी म ानवंदना देऊन दहीहंडी फोडण्याचा थरार अनुभवला.
या उत्सवामध्ये लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनीच सहभाग घेतला. नागरिकांनी मोबाईलमध्ये व्हिडिओ आणि फोटो काढून या क्षणांना कैद केले. अनेक ठिकाणी महिला मंडळांनीही पारंपरिक वेशभूषा परिधान करून दहीहंडीच्या उत्सवात सहभाग घेतला होता. सुरक्षिततेची काळजी घेऊन, पोलीस प्रशासनानेही योग्य नियोजन केले होते. यंदाच्या दहीहंडी उत्सवात पावसाची साथ मिळाल्याने आनंदाचे वातावरण होते आणि सर्वत्र जल्लोषात हा सण साजरा झाला.

#### युवकांनी धर्माकडे ...

नगरसेवक दीपक बोराडे, अजय अवचार, कैलास बोराडे, दत्ताभाऊ बोराडे, दीपक बोराडे, अंबादास हातकडके, विजय बोराडे कपिल तिवारी सतीश बोराडे, बाळासाहेब काळे संजय गायकवाड, गोपाळ काटकर यांच्यासह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उपराष्ट्रपती पदासाठी मनोज सिन्हा यांचे नाव चर्चेत

**नवी दिल्ली** - भारतीय जनता पक्षानं उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडीसाठीची प्रक्रिया वेगवान केली आहे. संभाव्य उमेदवार कोण असेल याबाबत चर्चा सुरु आहेत. पक्षाचे नेते रविवारी पुन्हा एकदा बैठक घेणार आहेत. एका वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार दिल्लीचे नायब राज्यपाल वीके सक्सेना, बिहारचे राज्यपाल अरिफ मोहम्मद खान यांची नावं आघाडीवर आहेत. याशिवाय गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, सिक्कीमचे राज्यपाल ओम माथूर आणि जम्मू काश्मीरचे राज्यपाल मनोज सिन्हा यांची नावं देखील चर्चेत आहेत. याशिवाय आरएसएसचे सेषाद्री छारी चर्चेत आहे.

# गरिबीचे चटके सोसल्याशिवाय माणूस मोठा कसा होईल?

माणसाला जीवनात जर मोठं व्हायचं असेल तर अगोदर गरिबीचे अनंत चटके हे सोसावेच लागतात. गरिबीतून प्रवास केल्याशिवाय यशाचे ठिकाण सापडणे शक्य नाही. गरिबीतून श्रीमंतीकडे म्हणजेच यशाकडे वाटचाल करण्यासाठी माणसाला गरिबीचे अनंत चटके तर सोसावेच लागतात परंतु अनेक वेगवेगळ्या संकटांना तोंड देत हा खडतर यशाचा प्रवास पूर्णत्वास न्यावा लागतो. त्यासाठी अनेकदा अपयशाचा, कित्येक खाच खळग्याचा व दुः खाचा सामना करावा लागतो. तेव्हा कुठे माणूस यशस्वी होऊन पैशाने व धनाने मोठा होतो. या जगात जी माणसे यशाला काबीज करून मोठ्या पदावर विराजमान झाली आहेत, त्यांनी अगोदर गरिबीचे अनंत चटके सोसून शून्यातून विश्व निर्माण केलेले असते. कोणताच माणूस सहजासहजी मोठा होत नसतो. अगोदर गरिबीचे चटके सोसल्याशिवाय यशाच्या गादीवर बसता येत नाही. जी माणसे गरिबीचे चटके सोसत यशाच्या दिशेने वाटचाल करतात तीच माणसे लवकर मोठी होतात. पण जी माणसे गरिबीला दोष देऊन तिथेच बसतात आणि यशाच्या दिशेने वाटचाल करायचे सोडतात, ती माणसे जीवनात कधीच यशस्वी होत नाहीत. जीवनात यशस्वी होण्यासाठी निरंतर व सातत्याने प्रयत्न करतच राहावे लागतात. परिस्थिती कितीही हालाखीची व बिकट असू द्या, काही फरक पडत नाही. पण समोरचा माणूस जर तिखट असेल तर तो परिस्थितीला लोळवल्या शिवाय राहत नाही. आतापर्यंतचा इतिहास आहे, जो माणूस शेवटपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करत राहिला, त्याच्या पदरात यशाचा पाऊस पडलाच आहे.

यशाने त्याला कधीच हुलकावणी दिली नाही. हे कोणालाही नाकारता येणार नाही. पण काहीजण सातत्याने व निरंतर प्रयत्न न करता परिस्थितीला व गरिबीला दोष देऊन येणाऱ्या थोड्याफार अडचणींना व संकटांना घाबरून यशाची पुढील वाटचाल करायची थांबवतात. परिस्थितीला व नशिबाला नावे ठेवतात. एखाद्याने जर विचारले की, बाबा रे तू शिक्षण का थांबवलास? तर त्याला म्हणतात की, अहो काका माझी परिस्थिती तेवढी भक्कम नाही हो! माझे आईवडील शेतात काबाडकष्ट करून कसाबसा घर प्रपंच चालवतात आणि माझ्या शिक्षणाला ते कुठून पैसा लावतील? असे उत्तर त्यांच्याकडून हमखास ऐकायला मिळते. हल्ली शिक्षण अर्ध्यावर सोडणारी व शिक्षणाच्या प्रवाहातून दुरावलेली मुले शिक्षणाचे खापर आई-वडिलांच्या माथ्यावर फोडून मोकळे होतात. आई-वडिलांना व परिस्थितीला दोषी ठरवून त्यांची नाहक बदनामी करतात. खरे तर कोणतेच आई-वडील आपल्या मुलांना शिक्षण शिकवण्यास कमी पडत नाहीत. त्यासाठी परिस्थिती कितीही बिकट असू द्या, शिक्षण शिकवायची ऐपत नसताना देखील ते मुलांच्या शिक्षणासाठी सावकाराचे कर्ज काढतात, एखाद्याच्या शेतात सालगडी म्हणून नोकरी धरतात, घरातील सोन्याची दागिने गहाण ठेवतात पण आपल्या मुलांना शिक्षणासाठी पैसा लावतात. फक्त मुलांची शिकण्याची तयारी असायला हवी. पण मुलांना विनंती आहे की, शिक्षण सोडण्याचे खापर विनाकारण आई-वडिलांच्या माथ्यावर फोडू नका... नाहक परिस्थितीला दोष देत बसू नका...तुमच्यात शिक्षण शिकायची धमक नाही म्हणून सरळ सांगा ना...म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल याची शाश्वती तुम्हाला सुद्धा नाही असेच म्हणावे लागेल...माणसाला यशस्वी होण्यासाठी परिस्थिती कधीच आडवी येत नाही. माणूसच परिस्थितीला घाबरून माघार घेतो. मान्य आहे की, तुमची परिस्थिती फार बिकट व नाजूक आहे. म्हणून तुम्हाला अनेक अडथळ्यांचा व संकटांचा सामना करावा लागत आहे. गरिबीचे चटके सोसावे लागत आहेत. म्हणून तुम्ही शिक्षण अर्ध्यावर सोडून कुठेही भरकटत आहात. आई-वडिलांना व परिस्थितीला दोष देत आहात. आपल्याला यश सहजासहजी कसे मिळेल हो? त्यासाठी मेहनत, जिद्द व चिकाटी याची सांगड घालावी लागते. समोर येणाऱ्या संकटांना हिंमतीने तोंड द्यावे लागते. गरिबीचे चटके सोसावे लागतात. लोखंडाला घडवायचे असेल तर अगोदर त्याला भट्टीत गरम करावे लागते आणि मग त्याच्यावर घनाचे घाव घालावे लागतात. तेव्हा कुठे छानपैकी एखादी वस्तू आकाराला येते. मानवी जीवनाचे ही तसेच आहे. माणसाला जर जीवनात मोठे व्हायचे असेल, जीवन ध्येय गाठायचे असेल तर अगोदर गरिबीचे विखारी चटके सोसावेच लागतात. तेव्हा कुठे माणूस मोठ्या उंचीवर पोहोचतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची परिस्थिती खरंच उच्च शिक्षण घेण्यासारखी होती का? बाबासाहेबांना शिक्षण घेत असताना किती आर्थिक व सामाजिक संकटांना तोंड द्यावे लागले, याचा विचार आपण केलाय का कधी? बाबासाहेबांची परिस्थिती जेवढी गरीब होती, तेवढी हल्ली तर आपली नाही ना? डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकेक पावाचा तुकडा खाऊन शिक्षण शिकत राहिले...गरिबीचे व येथील सामाजिक व्यवस्थेचे विखारी चटके सोसत राहिले आणि यशस्वी होऊन परिस्थितीला व येथील व्यवस्थेला लोळवत राहिले. बाबासाहेबांनी शून्यातून विश्व निर्माण केले. भारतीय संविधान लिहून, दीन, दलित, शोषित, पीडित, वंचित आणि उपेक्षितांना न्याय मिळवून दिला...आज संपूर्ण जगात बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते...सगळ्या जगात बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार होतो...बाबासाहेबांनी गरिबीला दोष न देता परिस्थितीमुळे निर्माण होणारे गरिबीचे विखारी चटके सोसले म्हणून बाबासाहेब भारतीय घटनेचे शिल्पकार व आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माते आणि ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखले जात आहेत....

म्हणून बांधवांनो, गरीब परिस्थितीमुळे खचून न जाता, गरिबीच्या चटक्याला न घाबरता परिस्थितीमुळे निर्माण होणारे विखारी चटके सहन करत चला...नक्कीच तुम्ही सुध्दा जीवनात यशस्वी होऊन मोठ्या उंचीवर पोहोचाल...आपोआपच लोक तुम्हाला मोठं करतील आणि तुम्ही सुद्धा मोठे व्हाल... त्यासाठी सातत्य, जिद्द, मेहनत व चिकाटी यांची सांगड घालून येणाऱ्या संकटावर हिंमतीने मात करावी लागेल.

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## चंद्रशेखर आझाद मैदानात शिवचैतन्य प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी महोत्सव २०२५ भूमिपूजन सोहळा संपन्न

# उत्सवातून राजकीय व सामाजिक एकतेचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील पारंपरिक आणि लोकप्रिय ठरलेला शिवचैतन्य प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी महोत्सव २०२५ यंदा अधिक मोठ्या आणि भव्य स्वरूपात पार पडणार असल्याचे चित्र भूमिपूजन सोहळ्यातून स्पष्ट झाले. चंद्रशेखर आझाद मैदानावर पार पडलेल्या या विधीला शहरातील अनेक मान्यवर, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते व तरुणाईची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

शिवचैतन्य प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी महोत्सव २०२५ चे भूमिपूजन चंद्रशेखर आझाद मैदान येथे धार्मिक विधी व मंत्रोच्चारांच्या गजरात मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत व युवा नेते अक्षय गोरंट्याल यांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजन करण्यात आले.

शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतिक दानवे यांनी सांगितले की, दहीहंडी महोत्सव हा फक्त खेळाचा वा मनोरंजनाचा कार्यक्रम नाही; तो तरुणांना संघटित करणारा, शहरात बंधुभाव निर्माण करणारा आणि पारंपरिक संस्कृती जपणारा महोत्सव आहे. यंदा हा सोहळा भव्यदिव्य करण्याचा आमचा निर्धार आहे.

दहीहंडी महोत्सव म्हणजे केवळ क्रीडा स्पर्धा नसून, धाडस, टीमवर्क, श्रद्धा आणि उत्सवाचे मिश्रण आहे. यंदा मैदानावर अनेक गोविंदा पथके सहभागी होणार असून, सुरक्षा, प्रकाशयोजना, सांस्कृतिक कार्यक्रम यांची तयारीही मोठ्या प्रमाणावर केली जात आहे.

या प्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतिक दानवे, सतिश जाधव, रमेश गोरक्षक, सौ. वर्षाताई ठाकूर, सौ. संगिताताई पांजगे, सौ. सखुबाई पनबिसरे, कपिल भूरेवाल, धनराज काबलीये, विष्णूबापू डोंगरे, शशिकांत घुगे, सुनिल पवार, संजय डोंगरे, सुनिल खरे, महेश निकम, सचिन मोहता, आनंद झारखंडे, सोमेश काबलीये, दत्ता जाधव, योगेश विधाते, रोहित दिपवाल, मनोज इंगळे, बद्रीनाथ भासंडे, कैलाश उबाळे, राजाराम जाधव, देविदास देशमुख, राजेश जोशी, रोहित खोडवे, कैलाश दानवे, केतन डोंगरे, अतिश अग्रवाल, पंकज देविदान, पृथ्वीराज देशमुख, गुलाब पनबिसरे, शाम उगले, सुहास वावरे, कृष्णा शिंदे, अजय कोल्हे, शुभम कापसे, ऋत्विक देवडे, आकाश बनवारी यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या भूमिपूजन सोहळ्याने दहीहंडी महोत्सवाच्या भव्य तयारीला सुरुवात झाली असून, यावर्षीचा सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांत जालना जिल्ह्यात राजकीय स्पर्धा आणि गटबाजीचे वातावरण जाणवले होते. मात्र अशा उत्सवांच्या निमित्ताने सर्व स्तरातील लोक एकत्र येतात. त्यामुळे दहीहंडी महोत्सव हा फक्त धार्मिक कार्यक्रम न राहता, सामाजिक एकता आणि राजकीय संतुलन साधण्याचे व्यासपीठ म्हणूनही महत्त्वाचा ठरतो.



**कृषी उत्पन्न बाजार समिती जालनाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी सात पन्नास वाजता स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण बाजार समितीचे प्रशासक शरद संपतराव तनपुरे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. यावेळी बाजार समितीचे सचिव अनिल खंडाळे, होलसेल किराणाचे अध्यक्ष सतीश पंच, वीरेंद्र रुणवाल, सुनील गोयल, गोविंद सराटे, जफरखान हमीद खान, भरत तनपुरे, अजय मिरकड, शिवानंद पालवे, प्रसाद काकडे, हार्दिक फलके, संजय जाधव आदींची उपस्थिती होती. (छाया - अनिल व्यवहारे)**

# अहंकार देऊळगाव येथील जिप शाळेत विविध उपक्रमांनी ‘आझादी का अमृत महोत्सव’ साजरा

**जालना । प्रतिनिधी -** पीर कल्याण केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अहंकार देऊळगाव येथे दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत ‘आझादी का अमृत महोत्सव’ उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेमध्ये तिरंगा रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.

गावातून विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने गावकऱ्यांचे लक्ष वेधले.

दि. १४ ऑगस्ट रोजी ‘फाळणी दुःखद स्मृतिदिन’ किंवा ‘विभाजन विभिषिका दिवस’ साजरा करण्यात आला.

ध्वजारोहण: तीन दिवस ध्वजारोहण करण्यात आले.

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य कार्यक्रमात गावातील गोपाळ खरात यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्री गणेश डोईफोडे होते. अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री सिद्धार्थ गजभिये यांनी प्रास्ताविक भाषणात स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व आणि शाळेतील उपक्रमांची माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत सादर केली. सम्यक अकॅडमीचे संचालक माजी सैनिक चंद्रकांत खरात यांनी त्यांच्या आईच्या नावाने सुरू केलेल्या शिष्यवृत्तीचे वाटप प्रत्येक वर्गातील तीन गुणवंत विद्यार्थ्यांना केले.

शिक्षक श्री संतोष खरात यांनी तंबाखूमुक्ती,



प्लॅस्टिकमुक्ती आणि स्वच्छतेची शपथ दिली. तसेच 'हर घर तिरंगा' आणि 'हर घर स्वच्छता' याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. युवाशक्ती सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अमोल खरात यांनी शाळेतील एकल पाल्य असलेल्या दहा विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री गणेश उगले यांनी केले आणि श्री प्रकाश मानसुरे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सहशिक्षिका श्रीमती सुशीला भोरजार, श्रीमती इंदुमती राठोड, अंगणवाडी सेविका श्रीमती कावेरी ईप्पर आणि मदतनीस श्रीमती सुनिता खरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पुढील पाच दिवस पावसाचा जोर कायम

**मुंबई -** सध्या राज्यात पावसाचा जोर वाढला आहे. विविध भागात जोरदार पाऊस सुरु आहे. पावसामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत तर नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, राज्यात पुढील काही दिवसात १६ ते २१ ऑगस्ट २०२५ दरम्यान अतिवृष्टीसह वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईकडून ही माहिती देण्यात आली आहे.

# मंठा तालुक्यात सोयाबीनवर हुमणी अळीचा प्रकोप, एक हेक्टर पीक नष्ट



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील शेतकरी सध्या नैसर्गिक संकटांमुळे हवालदिल झाले आहेत. गतवर्षी अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने या वर्षी सोयाबीनची पेरणी केली होती. सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने पिकेही चांगली दिसू लागली. परंतु, आता अंभोरा जहागीर येथील शेतकरी बळीराम बाहेकर आणि किसन बाहेकर यांच्या गट क्रमांक ६१, ३४, ४२ मधील सुमारे एक हेक्टर सोयाबीनचे पीक हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे पूर्णपणे नष्ट झाले आहे.

यावर्षी मान्सून वेळेपूर्वीच आल्याने शेतकऱ्यांनी लगेच पेरणी केली. पीक चांगले उगवले असतानाच जुलै महिन्यात कोळपणी सुरू असताना सोयाबीनवर हुमणी अळीचा प्रकोप सुरू झाला. या अळीमुळे सोयाबीनची पाने पिवळी पडून पीक सुकले आणि पूर्णपणे नष्ट झाले आहे. महागडी औषधे फवारूनही या अळीचा प्रादुर्भाव आटोक्यात न आल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

हुमणी अळीमुळे एक हेक्टर सोयाबीन पीक नष्ट झाल्यामुळे बाहेकर बंधूंवर आर्थिक संकट आले आहे. त्यांनी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन, नष्ट झालेल्या पिकाचे पंचनामे करून तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

# हर घर तिरंगा रॅलीत स्काऊट गाईडचा उत्स्फूर्त सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** 'हर घर तिरंगा' अभियानाचा एक भाग म्हणून जालना जिल्हा प्रशासनातर्फे आज, दि. १४-०८-२०२५ रोजी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेपासून या रॅलीची सुरुवात झाली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पी. एम. मिनू यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली.

या रॅलीमध्ये स्काऊट, गाईड, स्काऊटर आणि गाईडर मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. त्यांनी राष्ट्रध्वजाला समर्पित घोषवाक्य असलेले फलक घेऊन देशभक्तीपर विविध घोषणा देत जनजागृती केली.

याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनू पी. एम., शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगीता भागवत, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात, उपशिक्षणाधिकारी एस. टी. भालेराव, विनया वडजे, गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे, जिल्हा संघटक मिलिंद तायडे, सोनिया शिरसाट, तसेच ज्येष्ठ स्काऊट मास्टर विनोद चौबे, चंद्रकांत नालाकुवल,



विजय म्हस्के, गाईड कॅप्टन विजया वाघ, कार्यालयीन कर्मचारी रमेश वारे, साईनाथ ठकुरवार आदी मान्यवर उपस्थित होते. नूतन विद्यालय जालना, संत ज्ञानेश्वर विद्यालय इंडेवाडी, आणि ज्ञानज्योत विद्यालय जालना येथील स्काऊट गाईड या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा संदेश देऊन जिल्हाधिकारी कार्यालयात रॅलीचा समारोप झाला.

## कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हर घर तिरंगा अभियान



**परभणी । प्रतिनिधी -** कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणीचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. नसीम बेगम अब्दुल सलीम यांनी सदर महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियान या उपक्रमांतर्गत स्वच्छतेची शपथ घेतली.तसेच देशभक्तीपर गीत संगीत विभागाच्या वतीने सादर करण्यात आले. व या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता अवचार आणि क्रीडा संचालक डॉ. अभिजीत सरनाईक, प्रशासकीय कर्मचारी, प्राध्यापक वृंद व बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होते.

# जालना गणेश फेस्टीवलमध्ये सभा मंडप पूजन

**जालना । प्रतिनिधी -** स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियममध्ये आज गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता कुदळ टाकून मान्यवरांच्या हस्ते सभा मंडपाचे भूमीपूजन संपन्न झाले.

यावेळी जालना पीपल्स बँकेचे चेअरमन तथा उद्योजक संजय मुथा, गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष अशोकराव आगलावे, जालना गणेश फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष संजय लाखे पाटील, भास्करराव अंबेकर, भास्करराव दानवे, भाऊसाहेब घुगे, फेस्टीवलचे माजी अध्यक्ष राजेंद्र गोरे, डॉ. संजय राख, राजेंद्र राख, शरद देशमुख, दिनेश फलके, किरण गरड, चंद्रशेखर वाळींबे, सुभाषराव कोळकर, माऊली कदम, अशोकराव उबाळे, अजिंक्य घोगरे, सुरेशराव मुळे, प्रा. राजेंद्र भोसले, चेअरमन बबनराव गाडेकर, अरविंद देशमुख, अशोकराव पडुळ, ॲड. देशमुख, राजेंद्र जाधव,सिध्दीविनायक मुळे, अवनिश गरड, सुहास मुंडे, प्रकाश जायभाये, रविंद्र हुसे, अविनाश भंडे, संजय देशमुख, श्री, पवार, ज्ञानेश्वर डोंगरे, आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविकपर भाषणात श्री. आगलावे म्हणाले की, फेस्टीवलचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे भाऊ कदम यांच्यासह अनेक सुरेख कलाकारांना आमंत्रीत करण्यात येणार असून बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंचवीस वर्षात या फेस्टीवलचे नांव पुणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात झाले असून विविध आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकर देखील येथे येऊन गेले आहे. त्याच धर्तीवर यंदाही कार्यक्रमाची रेलचेल राहणार अल्याचे ही आगलावे यांनी सांगितले. याप्रसंगी प्रमुख मान्यवरांनीही समयोचित भाषणे केली.



# जालना जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द - पालकमंत्री पंकजाताई मुंडे

**जालना | प्रतिनिधी -** जिल्ह्यातील जालना शहर औद्योगिक शहर म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. यापुढेही जालना जिल्ह्यात शासनाकडून विविध विकासात्मक कामे करुन आपल्याला विकास साधावयाचा आहे. तरी पालकमंत्री या नात्याने जालना जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द राहील, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिसरात भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती. तर यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण यांची उपस्थिती होती.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जिल्ह्यात नूकत्याच पार पडलेल्या महसूल सप्ताहाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वृक्ष लागवड, विविध दाखल्याचे वितरण, डिबीटीद्वारे लाभ, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे यासारखी अनेक उल्लेखनीय कामे करण्यात आली आहे. पाणंद रस्ते, शेतरस्ते मोकळे करणे अभियानातंर्गत जालना जिल्ह्यात एकुण १८० रस्ते ज्यांची लांबी २८८.२५ कि.मी.अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सन २०२५-२६ पासून तालूका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य स्तरांवर प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान' राबविण्यात येणार आहे.

जालना जिल्हा परिषदेने पर्यावरणपुरक आणि सामाजिक हितासाठी तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे यासाठी जिल्हा परिषद परिसर स्वच्छ व सुंदर राहावा याकरीता 'झिरो प्लास्टिक मोहिम' राबवून प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. याचप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यात देखील ही मोहिम राबविण्याचे प्रशासनाचा मानस आहे. तरी या मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना जिल्ह्यातील समग्र शिक्षा योजने अंतर्गत वर्ष २०२५-२६ मध्ये १५ जुन रोजी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील एकुण १ लाख ३८ हजार २१ विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील ५७ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी १३ विद्यार्थ्यांनी सुवर्ण तर २ विद्यार्थ्यांनी रौप्य आणि २ विद्यार्थ्यांनी कास्य राष्ट्रीयस्तरावरील पदके मिळवली आहेत. जिल्हा क्रिडा संकूलामध्ये अद्ययावत क्रिडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यामध्ये अंतर्गत टेनिस कोर्ट, सिंथेटीक बास्केटबॉल, आर्टिफिशियल क्रिकेट टर्फ, सिंथेटीक स्केटींग रिंग, व्हॉलीबॉल मैदान, कबड्डी मैदान, खोखो मैदान, जिम हॉल, , संरक्षक भिंत तसेच अंतर्गत रस्ते व ड्रेनेज लाईन आदि कामे जिल्हा क्रीडा संकुल समितीकडून विकसित करण्यात आली आहेत. तर ४०० मिटर सिंथेटीक ट्रॅक व नॅचरल फुटबॉल मैदानाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये स्पर्धा व सराव करण्याची वृत्ती निर्माण व्हावी या उद्देशाने जालना जिल्हाधिकारी यांच्या 'महादीप' या महत्वाकांक्षी योजनेतून श्रीहरी कोटा येथील इस्रो अंतराळ विज्ञान केंद्रातील संग्रहालयात जिल्ह्यातील ५० विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परिक्षा घेवून विमानाद्वारे सहल नेण्यात आली.

जिल्ह्यात नवीन गुंतवणूकीला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी एप्रिल २०२५ मध्ये जिल्हा गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत ४ उद्योगासोबत २ हजार ७९ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार झाले असून, यामधून सुमारे ३ हजार युवकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. पशुसंवर्धन विभागाने पूर्ण क्षमतेने काम करावे यासाठी महत्वाचे निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. तसेच पशुसंवर्धन व्यवसायाला आता कृषी समकक्षचा दर्जा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेमध्ये जालना जिल्ह्यातील सर्व विभागांनी केलेल्या अतिशय प्रभावी कामगिरीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले.

शंभर दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी ६ मे ते २ ऑक्टोंबर या कालावधीत दीडशे दिवसांचा कृती आराखडा जाहिर केला आहे. या उपक्रमांतर्गत 'विकसित भारत २०४७' च्या धर्तीवर 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन डॉक्युमेट तयार करण्यात येणार आहे. विकसित महाराष्ट्र-२०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाची प्रचलित कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, पारदर्शी आणि सहजसुलभ होण्यासाठी कोणत्या प्रकारच्या धोरणात्मक बाबी असाव्यात, याकरीता जिल्ह्यातील नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आपले अभिप्राय सादर करावेत. असे आवाहन करते.

स्व.गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेअंतर्गत अपघाताने मृत्यू झालेल्या व अपंगत्व आलेल्या एकुण २१० शेतकऱ्यांच्या वारसदारास ४.२५ कोटी रुपये रक्कम सानुग्रह अनुदान मंजूर केले आहे. नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प टप्पा -२ अंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये १७७ गावांची निवड करण्यात आली असून ग्राम कृषि विकास समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत ५३१ लाभार्थ्यांना २६.६४ कोटी रुपये कर्जाचे वितरण तर ११.३० कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, तिरंगामय वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भाषणानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते गौरवास्पद कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी, तसेच विर पत्नी, विर पिता यांच्यासह १०० दिवसांच्या कार्यक्रमात अव्वल आलेल्या कार्यालयाचाही यथोचित सन्मान करण्यात आला. उपस्थित लोकप्रतिनिधी, मान्यवर व नागरिकांची पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी भेट घेतली. प्रारंभी ध्वजारोहण झाल्यानंतर पोलीस दलाच्यावतीने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले व राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली.



# जालन्यात ४.९० कोटी रुपयांच्या सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्पाचे लोकार्पण



**जालना | प्रतिनिधी -** जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते आज, शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी जालना शहरात ४ कोटी ९० लाख रुपये निधीतून उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून शहरात ४८ ठिकाणी १९० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

वाढती गुन्हेगारी नियंत्रणात आणणे आणि घडलेल्या गुन्ह्यांचा जलद तपास करणे सोपे व्हावे, या उद्देशाने ही अत्याधुनिक यंत्रणा उभारण्यात आली आहे. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः कॅमेऱ्यांची चाचणी घेऊन संपूर्ण प्रणालीचा आढावा घेतला. याच कार्यक्रमात, पोलीस अधीक्षक कार्यालयात उभारण्यात आलेल्या पोलीस प्रशिक्षण कक्षाचे लोकार्पणही पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते झाले. तसेच, सीएसआर निधीतून ग्रेडर टी-पॉइंट येथे बसवण्यात आलेल्या वाहतूक सिग्नलचेही उद्घाटन करण्यात आले.



यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, कालिका स्टीलचे घनश्याम गोयल, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, भास्कर दानवे आदी मान्यवर उपस्थित होते.

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना भाजपाच्या वतीने अभिवादन

**जालना | प्रतिनिधी -** दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या जालना कार्यालयात अभिवादन करण्यात आले. भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी वाजपेयीजींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सोमेश काबलिये, सुदर्शन काळे, देविदास देशमुख, राजेश जोशी, गंभीरराव पडोळ, गोपाळ चौधरी, लासीराम राठोड, शाम उगले, योगेश सामलेटी, गौरव गोधेकर आदींसह उपस्थिती होती.







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.